2016

OCT -NOV

# Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

(Bi-Monthly)

Peer-Reviewed Journal

Impact factor: 2.125

VOL – V   Issues: V

**Chief-Editor:**

**Ubale Amol Baban**

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No V Issues V
OCT-NOV 2016 ISSN 2278-5655

# धनाजी जाधवांचे छत्रपती शिवाजी व संभाजी महाराजांशी संबंध:- शोध व बोध

**डॉ. डी. एस. कडव**
इतिहास विभाग प्रमुख
जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा

**सारांश :-**
सर्वसामान्यपणे धनाजी जाधव यांची ओळख मराठा स्वातंत्र्य युद्धातील सेनानी अशी आहे. संताजी व धनाजी या जोडीमुळे मराठ्यांना मोगलांविरुद्धच्या लढ्यात यश प्राप्त झाल्याचा समज सर्वत्र आहे. त्यामुळे विशेषतः धनाजी जाधवाने केवळ छत्रपती संभाजी राजांच्या वधानंतर सुरु झालेल्या मोगल - मराठा संघर्षाचे काळातच कामगीरी पार पाडल्याचे मत बनल्याचे जाणवते, पण हि वस्तुस्थिती नसून तत्पूर्वीही छत्रपती शिवाजी व संभाजी महाराजांच्या काळातही महत्वपूर्ण कामगीरी केली असल्याची व मराठा राज्याच्या उभारणीत धनाजीचे योगदानही मोठे असल्याची माहिती विधार्थी, अभ्यासकांना व सर्व सामान्यांना व्हावी या उद्देशाने सदर शोध निबंध सादर करीत आहे.

धनाजी जाधव यांच्या जन्माची निश्चित नोंद असणारा पुरावा वा दस्ताऐवज उपलब्ध नाही. पण काही इतिहासकारांनी काढलेल्या निष्कर्षावरून धनाजींचा जन्म १६५० च्या सुमारास झाला असावा.[१] मा.गो.स.सरदेसाई यांनी सिंद्खेडकर जाधव घराण्याच्या दिलेल्या वंशावळीवरून धनाजी जाधव यांचा वंश सिंद्खेडेकर जाधव घराण्याशी संबंधीत असल्याचे दिसून येते.[२]

शंभूसिंह उर्फ संभाजी हे धनाजी जाधवांच्या वडिलांचे नाव होते त्यांचे बालपण पुण्याला जिजाबाईकडे गेले. ते जिजाबाईकडेच पुण्याला वास्तव्याला होते. शंभूसिंह व शिवाजी राजे यांच्या शिक्षणाची व्यवस्था जिजाबाईने केली होती.[३]

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्याला प्रारंभ केल्यानंतर त्या कार्यात शंभूसिंह जाधाव हे सुद्धा सामील झाले होते. शिवाजी महाराजांच्या अंगरक्षक दलात शंभूसिंहाचा समावेश होता. सिद्दीजोहर याने शिवाजी महाराजांच्या विरोधात जी मोहीम काढली होती, त्या वेळी पावनखिंड येथे १३ जुलै १६६० रोजी झालेल्या लढाईत शंभूसिंह जाधवही बाजीप्रभू देशपांडे प्रमाणेच मारल्या गेले होते.[४]

शंभूसिंहाच्या बलीदानानंतर धनाजी जाधवांच्या शिक्षण व प्रशिक्षणाची व्यवस्था शिवाजी महाराजांनी केली. धनाजीना लष्करी कार्याचे प्रशिक्षण प्राप्त व्हावे म्हणून त्यांनी धनाजीना सेनापती प्रतापराव गुजर यांच्या अधिपत्याखाली ठेवले.[५] २ फेब्रुवारी १६६१ रोजी शाहिस्तेखान व

करतलबखान यांच्या विरोधात उंबरखिंडीची लढाई झाली. त्या लढाईत प्रतापराव गुजर व धनाजी जाधव सामील झाले होते.[६] या युद्धात मराठे विजयी झाले होते. १६७२ मध्ये शिवाजी महाराज व विजापूरचा आदिलशहा यांच्यात युद्ध झाले. या युद्धाच्या वेळी महाराजानी प्रतापराव गुजर यांच्या सोबत धनाजी जाधव यांनाही पाठविले होते. धनाजी व संताजी घोरपडे यांनी यावेळी विजापूरच्या प्रदेशात मराठ्यांचा अंमल बसविण्यास प्रारंभ केला. या विरुद्ध विजापूरचा सरदार बहलोलखान याने मोहिम काढली. दोन्ही पक्षात उंबराणी या ठिकाणी संघर्ष झाला. यात बहलोलखानाला माघार घ्यावी लागली. धनाजीने उंबराणीच्या युद्धात बराच पराक्रम गाजवील्यामुळे योद्धा म्हणून त्यांना ओळखले जाऊ लागले.[७] त्यानंतर १६७४ मध्ये पुन्हा बहलोलखान यांच्या विरोधात मराठ्यांना युद्ध करावे लागले. या युद्धात मराठा सैन्याने नेतृत्व हंसाजी मोहिते ( नंतरचे हंबीरराव ) यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली धनाजी जाधव हे सुद्धा युद्धात सामील झाले होते. हे युद्ध मराठ्यांनी जिंकले. या युद्धात धनाजीने बराच पराक्रम गाजविले. त्या बद्दल शिवाजी महाराजांनी धनाजीचा गौरव करून स्वतंत्र सरदारी दिली.[८]

नेसरीच्या युद्धानंतर शिवाजी महाराजांनी मराठ्यांचा सेनापती म्हणून हंबीरराव मोहिते यांची नेमणूक केली. १६७४ मध्ये आदिलशाही दरबाराने शिवाजी महाराज्यांच्या विरोधात संघर्ष सुरु केला. याचा प्रतिकार करण्यासाठी महाराजांनी वेगवेगळ्या दिशेने विजापूर विरुद्ध सैन्य रवाना केले. एक तुकडी धनाजींच्या ही नेतृत्वाखाली रवाना केली होती. त्या तुकडीने बरेच यश प्राप्त केले होते. या यशमुळेच धनाजींचा समावेश नामांकित सरदारांमध्ये होऊ लागला होता. १६७४ मध्ये शिवाजी महाराज्यांच्या राज्याभिषेकाच्या वेळी चिटणीसांनी नामांकित सरदारांची जी यादी दिली होती, त्या यादीत धनाजी जाधावांचाही समावेश होता.[९]

राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजय अर्थात कर्नाटक मोहीम हाती घेतली. या मोहिमेत धनाजी जाधवही सामील होते. त्यांनी “बालगौडपूर” येथील लढाईत भागही घेतला होता. कर्नाटक मोहीम अर्धवट सोडून महाराज महाराष्ट्रात परत आल्यानंतर कर्नाटक मोहिमेची जबाबदारी त्यांनी ज्यांच्यावर सोपविली होती त्यामध्ये धनाजींचाही समावेश होता.[१०]

सर जदुनाथ सरकारांनी नमूद केले आहे त्याप्रमाणे, “जानेवारी १६७७ मध्ये हंबीररावाने हुसेनखान मिय्यानाचा पराभाव करून त्याला कैद केले होते. हि बातमी विजापूर दरबाराला कळताच त्या दरबाराने अधिकची फौज मिय्यानाच्या सुटकेसाठी रवाना केली होती. त्यावेळी धनाजी जाधवही हंबीररावाचा मदतीला धावून गेले होते.[११] झालेल्या संघर्षात मराठे यशस्वी ठरले. त्यानंतर धनाजी जाधव शिवाजी महाराजांच्या भेटीकरिता रायगडला गेले. त्यावेळी शिवाजी महाराजांनी कर्नाटकात धनाजीनी केलेल्या कामगीरीचा गौरव केला.[१२] ३ एप्रिल १६८० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या

मृत्यूसमयी धनाजी रायगडावर हजर होते. शिवाजी महाराजा नंतर राजारामाला छत्रपती पदावर बसविण्याचे कारथान रचल्या गेले होते. पण या कारस्थानात धनाजी जाधाव सामील झाले नव्हते. उलट संभाजी हेच शिवाजी महाराजांचे खरे वारस असल्याची भूमिका घेऊन धनाजी जाधवांनी सेनापती हंबीरराव मोहिते यांच्याशी मिळून संभाजीला छत्रपती पदावर बसविले.[१३]

संभाजीच्या राज्यारोहनानंतर मराठे व मोगल संघर्षाला प्रारंभ झाला. औरंगजेब बादशाहने आज्जम याला मराठ्यांचे किल्ले ताब्यात घेण्यास पाठविले. आज्जम याने बागलानच्या प्रदेशातील साल्हेरच्या किल्ल्याला वेढा दिला. संभाजी राजांनी सेनापती हंबीरराव मोहिते सोबत धनाजीलाही आज्जमच्या बंदोबस्ताकरीता रवाना केले. पण यावेळी त्यांना माघारी फिरावे लागले.[१४]

यावेळच्या धनाजी जाधवांच्या हालचालीची माहिती तत्कालीन मोगल दरबाराच्या फारसी कागदपत्रामध्ये नमूद आहे. जानेवारी १६८४ च्या पत्रात मुज्जफरखान जहान बहादूर लिहितो " मी सोनेगाव वरून शत्रूचा पाठलाग करीत एकटाच २० कोसावरील पूर येथे पोहचलो, येथे लढाई झाली. शत्रूकडील जाधव आणि काकोजी यांना जखमी केले..."[१५]

दि. १२ जानेवारी १६८४ च्या दुसऱ्या पत्रात नमूद केले आहे की, "संभाजी, जाधवराव ( धनाजींना जाधावराव म्हणूनही संबोधिले जात होते ). जानराव वगेरे तीन सरदार १८ हजार स्वारांसह विजापूरच्या जवळपास आले होते. तेव्हा मी (खानांने) फौजेसह अफजलपूरहून स्वारी केली. ईंडीयद ( इंडो ) याठिकाणी सामना झाला. अनेकांना जखमी करून पराभूत केले."[१६]

मोगल सम्राट औरंगजेबाने मराठा राज्यावर सर्वसामर्थ्यानिशी आक्रमण करून मराठ्यांचा प्रदेश उध्वस्त केल्यामुळे महसूल बुडाला होता. सततच्या संघर्षामुळे लष्करावरील खर्च वाढून तिजोरी रिकामी झाली होती. यावर उपाय म्हणून संभाजी राजांनी मोगेल प्रदेशात लुटमार करून संपत्ती प्राप्त करण्याचे व मोगलांना जशास - तसे उत्तर देण्याचे धोरण अंगिकारले होते. यानुसार १६८५ मध्ये संभाजी राजांनी भडोच शहराची लुट करण्यासाठी सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या सोबत धनाजी जाधव यांनाही पाठविले होते. या व्यतिरिक्त या सैन्याने बऱ्हाणपूर पर्यंतच्या सर्व मोगलांचा प्रदेश लुटून उध्वस्त केला होता.[१७]

अशाप्रकारे धनाजीने हंबीरराव मोहिते यांच्या नेतृत्वाखाली मोगलांशी प्रखर संघर्ष सुरु केला होता. पण वाईच्या युद्धात २० सप्टेंबर १६८६ रोजी सर्जाखानाकडून हंबीरराव मोहिते मारल्या गेले. पण त्यांच्या मृत्युचा परिणाम धनाजीनीही जाणवू दिला नाही.

दरम्यानच्य काळात माराठ्यांचा कर्नाटकातील कारभारी रघुनाथपंत मृत्यू पावल्यामुळे त्या प्रदेशाची व्यवस्था करण्याकरिता व जिंजीचा किल्ला हस्तगत करण्यासाठी संभाजी राजांनी धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांना कर्नाटकात पाठविले. त्यांनी कर्नाटकात गेल्यावर प्रदेशाची व्यवस्था

चांगल्या प्रकारे लावली व जिंजीचा किल्लाही ताब्यात आणला. [१८] धनाजी संताजी समवेत कर्नाटकात असतांनाच शेख निजामाने छत्रपती संभाजी राजांना कैद केल्याची बातमी कळताच धनाजी व संताजी कर्नाटकातून महाराष्ट्रात यायला निघाले. पण ते येण्यापुर्वीच औरंगजेब बादशाहने संभाजी राजांचा ३ मार्च १६८९ रोजी वध केला. [१९]

वा. सी. बेंद्रे यांनी मात्र संभाजीच्या वधाच्यावेळी धनाजी जाधव उत्तर भारतात असल्याचे नमूद केले आहे. पण डॉ. कमल गोखले यांनी धनाजी जाधव उत्तरेत नव्हते असेच मत व्यक्त केले आहे. ते योग्य ही वाटते.

**निष्कर्ष :-**

अशाप्रकारे धनाजी जाधव राजघराण्याशी संबंधित असल्याचे व त्यांना क्षात्रपरंपरा लाभल्याचे दिसून येते. जन्मापासूनच धनाजींचा संबंध शिवाजी महाराजांशी असल्याचे हि प्रत्ययास येते. शिवाजी महाराजांच्या पुढाकाराने त्यांना शिक्षण व प्रशिक्षण प्राप्त झाले होते. वडिलांप्रमाणेच धनाजी छत्रपती कुटुंबाप्रती निष्ठावान राहिले. छत्रपती शिवाजी व संभाजी महाराज्यांच्या काळात त्यांनी मराठा राज्याची सेवा केली. अर्थात त्यांचे हे कार्य उमेदवारी स्वरूपाचे होते. पण धनाजींनी सेनानी म्हणून स्वत:ची ओळख निर्माण केली. हि ओळख छत्रपती घराण्याशी संबंध असल्यामुळे नव्हे तर स्वत:च्या कर्तुत्व व पराक्रमामुळे त्यांनी निर्माण केली होती. शिवाजी महाराजांच्या काळात नामांकित सरदारांमध्ये धनाजीचा समावेश होणे हा त्याचा पुरावा होय. शिवाजी महाराजांची एकून कार्यपद्धती व राज्यकारभाराबाबतीतल्या दृष्टीकोनाचा विचार करता कर्तुत्व व पराक्रम केल्याशिवाय नामांकित सरदारांमध्ये स्थान मिळविणे शक्य नव्हते. अर्थात धनाजींच्या निष्ठेची खात्री असल्यामुळेच शिवाजी व नंतर संभाजी महाराजांनी त्याच्यावर महत्वपूर्ण जबाबदऱ्या सोपविल्याचेही प्रत्ययास येते. धनाजीमधील हि निष्ठा त्यानंतरही कायम टिकली. यामुळेच शाहू महाराजांच्या काळापर्यंत ते उच्चस्थानावर कायम टिकले. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते शाहूमहाराजांच्या काळापर्यंत सातत्याने मराठा सत्ताकारणात आपला प्रभाव व महत्व कायम टिकविणारे धनाजी जाधव एकमेव सरदार असल्याचेही दिसून येते. हेच प्रतिबिंबीत करण्यासाठी सदर शोधनिबंध प्रस्तुत होत आहे.

**तळटीपा** :-

१. आपटे द. वी., दिवेकर स. म. - " जेधे शकावली शिवचरित्र प्रदिप" भारतीय इतिहास संशोधन मंडळ, ग्रंथ क्र. ४, पुणे १९२५ पृ. १४,४९
२. सरदेसाई गो.स. - मराठा रियासत खंड २. पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९ पृ. ३८,३९

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No V Issues V
OCT-NOV 2016 ISSN 2278-5655

३. दळवी गो. दा. – मराठा कुलाचा इतिहास – भाग १, इंदू प्रकाशन, मुंबई, १९१२ पृ. ४२,४३
४. दळवी गो. दा. – कित्ता पृ. ४४
५. दळवी गो. दा. – कित्ता पृ ४४
६. आपटे व दिवेकर - "शिवभारत" अध्याय २५, श्लोक ३६, ५५ आणि अध्याय २८ श्लोक ६२,६३.
७. वाकसकर - ' सभासद बखर' १९५७ पृ. ७६, ७७
८. साने का. ना. – 'चिटणीस बखर' १९२३ पृ. ३१२
९. दळवी गो. दा. – पूर्ववृद्धूत पृ. ४५
१०. सरकार सर जदुनाथ - 'ब्रिटीश म्युझीयम ओरीजनल' १९४२ पृ. ८९
११. सरदेसाई गो. स. – मराठी रियासत खंड १ ला, आवृत्ती ३, पाप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९३५ पृ. २२९
१२. सरदेसाई - कित्ता व आपटे व दिवेकर – 'जेधे शकावली शिवचरित्र प्रदीप' पृ. ३०
१३. दळवी - पूर्ववृद्धूत – पृ. ३१०
१४. खरे ग. ह. – 'ऐतिहासिक फारसी साहित्यखंड ६' पत्र क्र. ४७६
१५. कित्ता पत्र क्र. ४७८
१६. दळवी - पूर्ववृद्धूत – पृ. ४७
१७. हेरवाडकर र. वि. - 'मल्हार रामराव चिटणीस विरचित श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे' पुणे, १९७२, पृ. २.
१८. पवार जयसिंगराव - ' छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ' प्रथम आवृत्ती पृ. ८८